रविवार, १ नोव्हेंबर २०२६

लोकरंग

जाणू, निवडू आणि वाचू आनंदे...

एकाग्रता मागणाऱ्या वाचनाचे महत्त्व रिल्सवर वेळेचा अतिअपव्यय होणाऱ्या युगातही अबाधित राहिलेय. दिवाळी अंकांचे आगमन आणि त्यांचे पारायण या आठवड्याभरापासून जोमात सुरू होईल. साहित्य आणि ग्रंथमहोत्सवांची रेलचेल पुढील दोन महिन्यांत राज्यातील सर्व शहरगावांत दिसेल. वाचकांना यात ग्रंथखरेदीस निवड सोपी जावी यासाठी 'वाचू आनंदे' या उपक्रमाद्वारे तयार झालेली यादी. विविध क्षेत्रांतील मान्यवर, लेखक, संपादक, चित्रकार, चित्रपट दिग्दर्शक यांनी वर्षभरात वाचलेल्या नव्या पुस्तकांतील कोणती चर्चेत आहेत याचे सम्यक ज्ञान यातून होऊ शकेल.

राष्ट्रगीताबाहेर उभा असलेला देश!

वरुण सुखराज

दीड कोटी आणायचे कुठून?

बीडीडी चाळीतील पात्र पोलिसांचे हक्काच्या घराचे स्वप्न हवेतच

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



मुंबई : बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पांतर्गत २०११ नंतर या चाळींत वास्तव्यास असणाऱ्या २२३ पोलीस शिपाई आणि हवालदारांना ५०० चौरस फुटांची घरे देण्याचा मार्ग सरकारी निर्णयामुळे अखेर मोकळा झाला आहे. मात्र, सरकारने निश्चित केलेल्या घरांच्या कोट्यवधी रुपयांच्या किमतींमुळे पोलिसांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सुटण्याऐवजी अधिकच जटील बनला आहे.

वरळीतील घरासाठी तब्बल १ कोटी ४८ लाख, ना. म. जोशी मार्गासाठी ८६ लाख ३० हजार, तर नायगावमधील घरासाठी ७२ लाख २५ हजार रुपयांचा भुर्दंड या पोलिसांना सहन करावा लागणार आहे. पोलीस शिपाई आणि हवालदारांचे मर्यादित वेतन पाहता, इतकी प्रचंड रक्कम उभी करणे आणि त्यासाठी बँकांकडून गृहकर्ज मिळवणे जवळपास अशक्य आहे. परिणामी, 'पात्र ठरूनही हक्काच्या घराचे स्वप्न हवेतच विरणार का?' असा हताश प्रश्न आता या पोलिसांच्या कुटुंबांसमोर उभा ठाकला आहे.

विशेष म्हणजे, याच बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पात १ जानेवारी २०११ पूर्वीच्या पात्र पोलीस कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या वारसांना ५०० चौरस फुटांची घरे अवघ्या १५ लाख रुपयांत मिळाली असून, २०२६ मध्ये त्यांना या घरांचा प्रत्यक्ष ताबाही देण्यात आला आहे. दुसरीकडे, त्याच पुनर्विकास प्रकल्पात आणि तेवढ्याच क्षेत्रफळाच्या घरासाठी २०११ नंतरच्या पोलिसांना मात्र ७२ लाखांपासून ते थेट १ कोटी ४८ लाख रुपयांची प्रचंड किंमत मोजावी लागणार आहे.

एकाच पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या एकाच प्रकल्पातील घरांच्या किमतीत असा दुजाभाव करणारी तफावत का? असा संतप्त सवाल आता पोलीस आणि त्यांच्या कुटुंबीयांकडून उपस्थित केला जात आहे. घरांच्या किमती निश्चित करताना सरकारी यंत्रणांकडून संबंधितांना विश्वासात घेण्यात आले नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

मुंबईसारख्या शहरात मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि वाढत्या महागाईचा खर्च सांभाळताना पोलीस शिपाई आणि हवालदारांना एवढी मोठी रक्कम भरणे शक्य नाही. सरकारने जुन्या पात्र पोलिसांप्रमाणेच १५ लाख रुपयांत घरे उपलब्ध करून द्यावीत आणि त्यासाठी सुधारित निर्णय काढावा, अशी मागणी बीडीडी पुनर्विकासातील घरासाठी पात्र रहिवाशी दत्तात्रय भापकर यांनी केली.

घरांच्या किमतीतील तफावतीचे समर्थन करताना म्हाडाच्या मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर यांनी बांधकाम खर्च आणि इमारतींच्या पायाभूत सुविधांवरील खर्चानुसार दर निश्चित केल्याचे स्पष्ट केले. या इमारतींचे बांधकाम निविदा प्रक्रियेद्वारे करण्यात आले असून, प्रत्येक ठिकाणच्या इमारतींची उंची आणि बांधकामाचे स्वरूप वेगवेगळे आहे. उदाहरणार्थ, वरळीतील इमारती ४० मजल्यांच्या, तर नायगावमधील इमारती २६ मजल्यांच्या आहेत. त्यामुळे बांधकाम आणि पायाभूत सुविधांच्या खर्चात फरक पडतो. त्यानुसार घरांच्या किमती निश्चित करण्यात आल्याने दरांमध्ये तफावत दिसत असल्याचे बोरीकर यांनी 'लोकसत्ता'ला सांगितले.

'परवडतील अशा दरांत घरे द्या'

बांधकाम खर्चाच्या आधारे किंमत निश्चित करण्यामागील तांत्रिक कारणे वेगळी असली, तरी या किंमती पोलीस शिपाई आणि हवालदारांच्या आवाक्याबाहेर आहेत. केवळ बांधकाम खर्चाचा निकष न लावता पोलिसांची आर्थिक क्षमता आणि यापूर्वीच्या पात्र लाभार्थ्यांना दिलेल्या सवलतींचा विचार करावा आणि ही घरे पोलिसांना परवडतील अशा दरांत सरकारने उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी पोलिसांच्या घरासाठी पाठपुरावा करणारे भाजपचे आमदार कालिदास कोळंबकर यांनी केली आहे.

'न्यायिक अधिकाऱ्याकडून न्यायमूर्तींच्या नावाचा गैरवापर'

मुंबई : नाशिक येथील 'श्री सप्तश्रृंगी निवासिनी देवी ट्रस्ट'मधील विश्वस्तांच्या नियुक्तीला स्थगिती देणारा, माजी मुख्य न्यायमूर्तींच्या विशेष अधिकाऱ्याद्वारे काढण्यात आलेला प्रशासकीय आदेश मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केला.

संबंधित अधिकाऱ्याने कायदेशीर अधिकार नसतानाही हा आदेश काढून घोर अयोग्य वर्तन केले असून मुख्य न्यायाधीशांच्या नावाचा गैरवापर केला आहे, असे ताशेरेही न्यायालयाने ओढले. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने संबंधित अधिकारी अंजू शेंडे यांच्या वर्तनावर कठोर शब्दांत ताशेरे ओढले. शेंडे यांनी १४ मार्च रोजी नाशिकच्या प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीशांना ई-मेलद्वारे पाच विश्वस्तांची शिफारस यादी त्वरीत मागे घेण्याचे आदेश दिले होते.

'एमपीएससी'च्या अर्ज प्रक्रियेत तांत्रिक बिघाड

न्यायदंडाधिकारी पदाच्या परीक्षार्थींसमोर पेच

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) ऑनलाइन अर्ज प्रणालीतील तांत्रिक बिघाडामुळे प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी (जेएमएफसी) पदासाठी अर्ज करणारे उमेदवार अपात्र ठरवले जात आहेत. मागील आठवडाभरापासून हा गोंधळ सुरू असल्याने उमेदवारांसमोर पेच निर्माण झाला आहे. त्यातच यासाठी अर्ज करण्याची ७ नोव्हेंबर ही अंतिम मुदत जवळ आल्याने परीक्षेच्या संधीवर पाणी पडण्याची भीती व्यक्त होत आहे.

जेएमएफसी पदाच्या परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रियेत मागील आठवडाभरापासून अर्जातील आवश्यक माहिती भरल्यानंतरही संकेतस्थळावर पात्र उमेदवारांसमोर 'नॉन-एलिजिबल' (अपात्र) असा शेरा दिसत आहे. त्यामुळे पुढील अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यात अडथळे येत आहेत. यासंदर्भात अनेक उमेदवार आयोगाकडे वारंवार संपर्क साधत आहेत. मात्र, प्रत्येक वेळी दिवसअखेरपर्यंत तांत्रिक अडचण दूर होईल, असे उत्तर त्यांना दिले जात आहे. प्रत्यक्षात समस्या कायम असल्याने अर्ज कसा पूर्ण करायचा, असा प्रश्न उमेदवारांसमोर उभा राहिला आहे.

मुदतवाढीची मागणी

- अर्जनोंदणीची ७ नोव्हेंबर ही अंतिम तारीख असल्याने तांत्रिक बिघाड वेळीच दूर न झाल्यास अनेक पात्र उमेदवारांना परीक्षेपासून वंचित राहावे लागू शकते.
- त्यामुळे आयोगाने तातडीने अर्जप्रणालीतील त्रुटी दूर कराव्यात, चुकीने अपात्र ठरवलेल्या उमेदवारांची पात्रता दुरुस्त करावी आणि गरज पडल्यास अर्जाची मुदत वाढवावी, अशी मागणी उमेदवारांकडून होत आहे.
- या संदर्भात अद्याप कोणतीही तक्रार आलेली नाही. मात्र, या प्रकाराची पडताळणी करून आवश्यक ती कार्यवाही केली जाईल. सर्व उमेदवारांना विनाअडथळा अर्ज करता यावा, याची खात्री केली जाईल, असे 'एमपीएससी'च्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

ऑफलाइन प्रवेशप्रकरणी कारवाई

लोकसत्ता प्रतिनिधी

कनिष्ठ महाविद्यालयांना दंड

मुंबई : मागील वर्षी इयत्ता अकरावीला जवळपास १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना ऑनलाइनऐवजी ऑफलाईन पद्धतीने प्रवेश देणाऱ्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांवर प्रतिविद्यार्थी पाच हजार रुपये दंड आकारण्यासह तेथील मुख्याध्यापक आणि प्राचार्यांवर कारवाई करण्याचे निर्देश माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने दिले आहेत.

ऑनलाईन नोंद नसल्याने या विद्यार्थ्यांना इयत्ता बारावीच्या परीक्षेला बसण्यास परवानगी मिळण्यात अडचणी येणार आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांना इयत्ता बारावीला ऑनलाइन पद्धतीने प्रवेश देऊन नियमित करावे, तसेच त्यांना बारावीच्या परीक्षेला बसण्यास मान्यता द्यावी, असे निर्देश सर्व विभागीय शिक्षण उपसंचालकांना देण्यात आले आहेत. ही प्रक्रिया सात दिवसांत पूर्ण करून त्याचा अहवाल शिक्षण संचालनालयाला सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

ऑफलाईन प्रवेश देऊन नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधित मुख्याध्यापक, प्राचार्यांकडून लेखी खुलासा मागविण्यात आला आहे. तसेच नियमबाह्य प्रवेश देणाऱ्या महाविद्यालयांवर प्रतिविद्यार्थी पाच हजार रुपये दंड आकारला जाणार आहे. हा दंड विद्यार्थ्यांकडून कोणत्याही परिस्थितीत वसूल करता येणार नाही. तसेच मुख्याध्यापक किंवा प्राचार्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर वेतनवाढ रोखणे, पदावनती यांसारखी शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

रेल्वेमार्गावर आज, उद्या ब्लॉक

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : देखभाल, दुरुस्तीच्या कामांसाठी पश्चिम रेल्वेमार्गावर शनिवारी रात्रकालीन आणि मध्य रेल्वेच्या मुख्य आणि ट्रान्स-हार्बर मार्गावर रविवारी मेगाब्लॉक घेण्यात येईल.

मध्य रेल्वे (मुख्य मार्ग)

- **कुठे :** सीएसएमटी ते विद्याविहार
- **कधी :** सकाळी १०.५५ ते दुपारी ३.५५
- **परिणाम :** सीएसएमटी आणि घाटकोपर येथून सुटणाऱ्या धीम्या लोकल सीएसएमटी ते विद्याविहारदरम्यान जलद मार्गावर वळवण्यात येतील. या लोकल कुर्ला, शीव, माटुंगा, दादर, परळ आणि भायखळा स्थानकांवर थांबतील.

ट्रान्सहार्बर मार्ग

- **कुठे :** ठाणे ते वाशी/नेरूळ
- **कधी :** सकाळी ११.१० ते दुपारी ४.१०
- **परिणाम :** ठाणे येथून वाशी, नेरूळ आणि पनवेलसाठी सुटणाऱ्या, तसेच वाशी, नेरूळ आणि पनवेल येथून ठाण्याच्या दिशेने सुटणाऱ्या लोकल रद्द राहतील.

दिवा स्थानकातील पुलाच्या कामासाठी वेळापत्रकात बदल

दिवा रेल्वे स्थानकात पादचारी पुलाच्या तुळया बसवण्यासाठी शनिवारी मुंब्रा ते दातिवलीदरम्यान मध्यरात्री १.१० ते ४.२५ दरम्यान ब्लॉक असेल. या कामामुळे शनिवारी मध्यरात्री सुटणारी लोकमान्य टिळक टर्मिनस-मडगाव एक्स्प्रेस मध्यरात्री १२.४५ ऐवजी पहाटे ४ वाजता सुटेल. तर मंगळुरू-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्स्प्रेस निळजे स्थानकात रात्री ३.३४ ते ४.२५ या वेळेत थांबवण्यात येणार आहे.

पश्चिम रेल्वे

- **कुठे :** बोरिवली ते भाईंदर
- **कधी :** शनिवारी रात्री ११.३० ते रविवारी पहाटे ४.३०
- **परिणाम :** सर्व जलद लोकल विरार-वसई रोड ते बोरिवलीदरम्यान धीम्या मार्गावर चालवण्यात येतील. या कालावधीत काही लोकल फेऱ्या रद्द करण्यात येणार आहेत.

लोणावळा रेल्वे स्थानकात 'टीसी'ला मारहाण

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथे तिकीट तपासणी कर्मचाऱ्याला मारहाण झाल्याची घटना ताजी असतानाच लोणावळा रेल्वे स्थानकातही एका तिकीट तपासणी कर्मचाऱ्याला प्रवाशाने मारहाण केल्याचा प्रकार समोर आला आहे. तिकीट तपासणीदरम्यान झालेल्या वादातून ही घटना घडली. याची चित्रफितही समाजमाध्यमांवर प्रसारित झाली आहे.

रेल्वे स्थानकातील फलाटावर तिकीट तपासणी सुरू असताना संबंधित टीसी आणि एका प्रवाशामध्ये वाद झाला. सुरुवातीला दोघांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. त्यानंतर वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. या प्रकारामुळे फलाटावर काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. याबाबत रेल्वे सुरक्षा दल आणि लोहमार्ग पोलिसांकडून चौकशी सुरू आहे.

मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड

निविदा करिता विनंती- MRVC-W-279

(एक पाकिट ई- प्रोक्योरमेंट निविदा प्रक्रिया)

मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लि. ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय दुसरा मजला, चर्चगेट स्टेशन इमारत, मुंबई-४०००२० येथे आहे, यांचे द्वारे **"मुंबई विभागातील बोरीवली-विरार विभागादरम्यान पाचव्या व सहाव्या रेल्वे मार्गाच्या कामाच्या अनुषंगाने सहायक चेतावणी प्रणाली (AWS) चा पुरवठा, स्थापना, चाचणी व कार्यान्वयनाचे कामासाठी"** ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदाचे तपशील आणि निविदा दस्तावेज ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **https://www.eprocure.gov.in/eprocure/app** वर उपलब्ध आहेत. पूर्ण भरलेली ई-निविदा वेबसाईट **https://www.eprocure.gov.in/eprocure/app** वर जमा करण्याची शेवटची तारीख **३०.११.२०२६ रोजी दु. १५.०० वा. पर्यंत आहे. शुद्धीपत्र, जर असेल, तर ते फक्त वैबसाईट वर प्रसिद्ध करण्यात येईल।**

MUMBAI DISTRICTS AIDS CONTROL SOCIETY
Established by
BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION
Regd. No. 891/98

No: MDACS / 3614 / Estt. Date: 30/ 10 /2026

RECRUITMENT NOTICE

Applications are invited from the Indian citizen for the following post to be filled up at Mumbai Districts AIDS Control Society on Contract Basis.

Sr. No.	Name of the post
01	Joint Director (IEC & MS)

The last date of receipt of application is 16 / 11 /2026. For details please visit **website www.mdacs.org.in**

Sd/-
Addl. Project Director,
Mumbai Districts AIDS Control Society
Acworth Leprosy Hospital, R.A. Kidwai Marg,
Wadala, Mumbai–400 031. Tel. 24100246/47

Life is precious ... ... Stop HIV/AIDS
Keep the Promise

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
६ वा मजला, विस्तारित इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

जाहिरात क्र. GAD/69/2026-Lokshahi Din. दिनांक : ३० ऑक्टोबर २०२६

जाहिरात

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगातील राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक व छत्रपती संभाजीनगर विभाग या पदांवरील नियुक्तीसाठी पात्र व इच्छुक व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर पदासाठीची सविस्तर जाहिरात, पात्रता निकष, अटी व शर्ती तसेच अर्ज सादर करण्यासाठीचा विहित अर्ज व जोडपत्र महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावरील **"ताज्या घडामोडी"** (What's New) या विभागामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यात अर्ज संपूर्णपणे भरून आवश्यक कागदपत्रांसह सादर करणे आवश्यक राहील. अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक **१६ नोव्हेंबर २०२६** असून, त्या दिवशी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत प्राप्त होणारे अर्जच विचारात घेतले जातील.

सही/-
(डॉ. अतुल पाटणे)
महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव

डीजीआयपीआर-२०२६-२७/५/सी३५०४

मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
ई-निविदा सूचना क्र. १५२/२०२६-२७

कार्यकारी अभियंता (पश्चिम) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ (दूरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४३२) हे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे / सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन / सीपीडब्ल्यूडी/एमईएस/ मुंबई महानगरपालिका / सिडको / रेल्वे / बीपीटी / एमआयडीसी / एम.जे.पी. यांचेकडे नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकूण / ७ कामांकरिता बी- १ (Percentage Rate) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	टप्पा	कालावधी	अ. क्र.	टप्पा	कालावधी
१	निविदा विक्री सुरू	०२/११/२०२६ सकाळी १०:३० वाजता	२	निविदा विक्री बंद	०९/११/२०२६ दुपारी ३:०० वाजता
३	तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक	१६/११/२०२६ दुपारी ३:०५ नंतर	४	आर्थिक बोली उघडण्याचा दिनांक	१७/११/२०२६ सकाळी १०:३० नंतर

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

टीप : १. विस्तृत ई-निविदा सूचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
२. निविदा सूचनेबाबत शुद्धिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

सीपीआरओ/ए/८१८ सही/-
म्हाडा – गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था कार्यकारी अभियंता (प),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

Follow us:@mhadaofficial

JAIPUR DEVELOPMENT AUTHORITY
Indira Circle, Jawahar Lal Nehru Marg, Jaipur-302004

No.: JDA/EE & TA to Dir. Engg.-I/2026-27/D- Date : 30.10.2026

NOTICE INVITING BID

NIB No. : EE & TA to Dir. Engg.-I/25/2026-27

Bids are invited from interested bidders for following works :-

S. No.	UBN No.	Cost of Work (Lacs)	Nature of Work	Last Date
1	JDA2627WSOB00396	246.01	Sports Complex on BOM Basis	16.11.2026
2	JDA2627WSOB00398	247.71	Sports Complex on BOM Basis	30.11.2026
3	JDA2627WLOB00399	5608.93	Drain Work	30.11.2026
4	JDA2627WLOB00400	1730.14	Road Work	20.11.2026
5	JDA2627WLOB00401	1794.28	Electric Work	18.11.2026
6	JDA2627WLRC00402	566.44	Electric Work	18.11.2026

Other particulars of the respective bid may be visited on Procurement Portal website www.sppp.rajasthan.gov.in, www.eproc.rajasthan.gov.in and www.jda.rajasthan.gov.in

Executive Engineer & TA to Dir. Engg-I

Raj.Samwad/C/26/12705

महाप्रित
महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित
(म.फु.मा.वि.म. ची उपकंपनी, महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

निवडीसाठी विनंती (RFS)

महाप्रिततर्फे बीएमसीच्या तानसा आणि/किंवा मोडक सागर जलाशयांवर १०० मेगावॅट क्षमतेच्या तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी RESCO फ्लोटिंग मॉडेलांतर्गत पात्र निविदादारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा MAHATENDERS पोर्टलवरून Bharat Electronic Tender पोर्टलवर स्थलांतरित करण्यात येत आहे. निविदा संदर्भ क्र. **MAHAPREIT/BMC/SPD/2026/1 दिनांक: १७/०१/२०२६.**

निविदा सादर करण्याची अंतिम तारीख : **०२/१२/२०२६, दुपारी ३.०० वाजेपर्यंत.** अधिक माहितीसाठी **www.mahapreit.in / www.bharat-electronictender.com** मुख्य महाव्यवस्थापक (RESCO II)

पश्चिम रेल्वे

पार्सल एसएलआर/व्हीपीच्या भाडेपट्ट्याच्या कंत्राटासाठी इ-लिलाव

मुंबई विभागातून सुटणाऱ्या गाड्यांमधील पार्सल एसएलआर भाडेपट्ट्याने देण्याच्या कंत्राटासाठी इ-लिलाव आयोजिण्यात आला आहे. आयआरपीएस वेबसाइटवर वस्तूसूची प्रसिद्ध करण्यात आली असून तपशील खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहेत. :–

कंत्राटाचा प्रकार : पार्सल, वस्तूसूची : पार्सल एसएलआर, कंत्राट कालावधी : ३ वर्षे

१. लिलाव वस्तूसूचि क्र. एमएमसीटी–पीएलएस–२६–९०

लॉट क्र.	
२१९०१–एसएलआर–आर१–बीडीटीएस–बीएसई–२६–१	१२४८०–एसएलआर–आर१–बीडीटीएस–जेटू–२६–१
२२९०९–एसएलआर–एफ१–बीएल–पुणे–२६–१	१४७०८–एसएलआर–आर१–डीडीआर–एचएमएफ–२६–२
२२९७१–एसएलआर–एफ१–बीडीटीएस–पीएमबीई–२६–१	१४८०८–एसएलआर–एफ१–डीडीआर–जेएू–२६–१

इ–लिलावाची तारीख व वेळ : लॉटचा इ–लिलाव ०६.११.२०२६ रोजी दुपारी १२ वाजता सुरू होईल. प्रारंभिक आवर्त कालावधी आहे ३० मिनिटे

२. लिलाव वस्तूसूची क्र. एमएमसीटी–पीएलएस–२६–९१

लॉट क्र.	
१९००३–एसएलआर–एफ२–डीडीआर–बीएसएल–२६–३	२२९६५–एसएलआर–आर१–बीडीटीएस–बीजीकेटी–२६–१
२२९३३–एसएलआर–आर१–बीडीटीएस–जेपी–२६–१	१२९११–एसएलआर–एफ१–बीएल–एचडब्ल्यू–२६–१
२२९६५–एसएलआर–एफ१–बीडीटीएस–बीजीकेटी–२६–१	

इ–लिलावाची तारीख व वेळ : लॉटचा इ–लिलाव १३.११.२०२६ रोजी दुपारी १२ वाजता सुरू होईल. प्रारंभिक आवर्त कालावधी आहे ३० मिनिटे

पार्सल एसएलआर्स/व्हीपीज ह्यांच्या इ-लिलाव संदर्भातील अधिक तपशिलांकरिता www.ireps.gov.in येथे भेट द्या. 0755

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly | आम्हाला फॉलो करा : X.com/WesternRly

Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: उरा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१.
दूरध्वनी: ०२२-३५५५ ५०००, फॅक्स: ०२२-२२०४ २२६८, ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

३० सप्टेंबर, २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीचा आणि अर्धवर्षाचा अलेखापरीक्षित एकत्रित वित्तीय परिणामांचा संक्षिप्त गोषवारा

(₹ कोटीत, प्रति समभाग आकडेवारी व्यतिरिक्त)

तपशील	संपलेले तिमाही ३० सप्टेंबर, २०२६	संपलेले अर्ध वर्ष ३० सप्टेंबर, २०२६	संपलेले तिमाही ३० सप्टेंबर, २०२५
विक्री व सेवा मूल्य (महसूल)	३६२,२६८	७०२,५२५	२८३,५४८
वजा: वसूल केलेला जीएसटी	२९,४०७	५७,८१४	२४,६५०
प्रचलनाद्वारे महसूल	**३३२,८६१**	**६४४,७११**	**२५८,८९८**
परपूर्व नफा	३८,६१३	६९,२४३	२९,१२४
करपश्चात नफा	**२९,२५०**	**५२,२५१**	**२२,१४६**
सहयोगी आणि संयुक्त उपक्रमांचा नफा/(तोटा) मधील हिस्सा	३००	४९५	(५४)
करपश्चात नफा आणि सहयोगी आणि संयुक्त उपक्रमांचा नफा/(तोटा) मधील हिस्सा	**२९,५५०**	**५२,७४६**	**२२,०९२**
एकूण सर्वसमावेशक मिळकत (कर वगळता)*	२८,३८६	५४,८४९	१७,९५२
भरणा केलेले इक्विटी समभाग भांडवल, इक्विटी समभाग प्रत्येकी ₹१०/- मूल्याचा	१३,५३३	१३,५३३	१३,५३२
पुनर्मूल्यांकित राखीव निधी वगळता इतर इक्विटी**	-	-	-
प्रति इक्विटी समभाग मिळकत (₹ मध्ये) (दर्शनी मूल्य ₹१०/- प्रत्येकी)			
मूळ (₹ मध्ये)	१८.८८	३४.३६	१३.४२
सौम्य (₹ मध्ये)	१८.८८	३४.३६	१३.४२

*नियंत्रण विरहित स्वारस्य शेअर समाविष्ट

**३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या वर्षांचा पुनर्मूल्यांकित राखीव निधी वगळता इतर इक्विटी ₹ ८९०,४९८ कोटी.

टिपा:

१. ३० ऑक्टोबर, २०२६ रोजी झालेल्या त्यांच्या संबंधित बैठकांमध्ये लेखापरीक्षण समितीने वरील परिणामांचा आढावा घेतला आहे आणि संचालक मंडळाने वरील परिणाम मंजूर केले असून ते प्रसारित करण्यास मंजुरी दिली आहे. कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी वरील परिणामांचा मर्यादित आढावा घेतला आहे.

२. प्रत्येकी ₹१० दर्शनी मूल्य असलेल्या आणि प्रति समभाग ₹१,११९ इतकी जारी करण्याची किंमत (प्रति समभाग ₹१,१०९ इतक्या सिक्युरिटी प्रीमियमसह) (इश्यू) द्वारे प्राथमिक सार्वजनिक ऑफर पूर्ण केल्यानंतर जिओ प्लॅटफॉर्म्स लिमिटेडच्या (जेपीएल) इक्विटी समभागांची नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया (एनएसई) आणि बीएसई लिमिटेड (बीएसई) वर २८ ऑक्टोबर, २०२६ पासून नोंदणी करण्यात आली आहे. प्रति समभाग ₹५४ इतक्या कर्मचारी सवलतीचा विचार केल्यानंतर ह्या इश्यूद्वारे मिळालेली एकूण रक्कम ₹३०,१८८ कोटी इतकी आहे.

निव्वळ प्राप्त रकमेपैकी ₹२७,५०० कोटी इतक्या एकूण रकमेचा उपयोग जेपीएलची प्रमुख उपकंपनी, रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेडने घेतलेल्या काही बाह्य व्यावसायिक कर्जांच्या थकीत मुद्दलाची पूर्ण किंवा अंशत: परतफेड करण्यासाठी वापरण्यात आली आहे. उर्वरित रकमेचा, प्रॉस्पेक्टसमध्ये नमूद केल्याप्रमाणे, भांडवल उभारणीच्या उद्दिष्टानुसार सर्वसाधारण कॉर्पोरेट उद्देशांसाठी उपयोग करण्यात येईल.

३. अलेखापरीक्षित स्वतंत्र वित्तीय परिणामांविषयी अधिक माहिती खालील प्रमाणे आहे:

(₹ कोटीत)

तपशील	संपलेले तिमाही ३० सप्टेंबर, २०२६	संपलेले अर्ध वर्ष ३० सप्टेंबर, २०२६	संपलेले तिमाही ३० सप्टेंबर, २०२५
विक्री व सेवा मूल्य (महसूल)	९८२,६०७	३५५,७५८	१३६,३५०
वजा: वसूल केलेला जीएसटी	७,९३९	१५,०७७	५,७४०
प्रचलनाद्वारे महसूल	**१७४,६६८**	**३४०,६८१**	**१३०,६९०**
करपूर्व नफा	२०,३३९	३७,९३९	१९,५९२
करपश्चात नफा	**१५,३५४**	**२८,६२६**	**९,१२९**
एकूण सर्वसमावेशक मिळकत (कर वगळता)	१४,४८५	२८,७६८	४,८११

४. ३० सप्टेंबर, २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीचा आणि अर्ध वर्षाचा तपशिलवार स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय परिणाम सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अॅन्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्टस्) रेग्युलेशन्स, २०१५ मधील रेग्युलेशन ३३ अनुशंगाने स्टॉक एक्सचेंजकडे सादर करण्यात आला आहे व वरील परिणाम त्यांचा संक्षिप्त गोषवारा आहेत.

३० सप्टेंबर, २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीचा आणि अर्ध वर्षाचा तपशिलवार स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय परिणाम स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईटसवर (**www.bseindia.com / www.nseindia.com**), कंपनीच्या वेबपेजवर **https://www.ril.com/investor/resource-center/corporate-announcements** येथे उपलब्ध आहेत आणि खालील क्विक रिस्पॉन्स कोड स्कॅन करून देखील ते उपलब्ध करून घेता येतील.

दिनांक : ३० ऑक्टोबर, २०२६

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
सही/-
मुकेश डी. अंबानी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

www.ril.com